# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन
- सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी तारणमुक्त कर्ज देणाऱ्या योजनेला प्रारंभ
- विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला येत्या तीन मार्चपासून सुरुवात, १० मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प
- वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट बसवण्यासाठी राज्य परिवहन विभागाकडून मुदत वाढ

आणि

- मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचं राज्यपालांचं आवाहन, दिल्ली साहित्य संमेलनाच्या गीताचं प्रकाशन

****

बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन असल्याचं, वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागराजू यांनी सांगितलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. ज्या बँकांमध्ये गैरव्यवहारामुळे खातेधारकांचे पैसे खात्यात अडकून पडले आहेत, अशा खातेदारांना, या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर अधिक रक्कम काढता येईल. सध्या अशा प्रकरणात ठेवीदारांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी परत मिळतात. विमा योजनेची खरेदी केल्यानंतर एक वर्षापर्यंत ग्राहकांना त्याबाबत फेरविचार करता येईल, असं नागराजू यांनी सांगितलं. वर्षभराच्या मुदतीत ग्राहकांना विमा योजना आवडली नाही, तर या योजनेच्या प्रीमियमपोटी भरलेली पूर्ण रक्कम परत मिळेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

****

सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग – एम एस एम ई साठी तारणमुक्त कर्ज देणाऱ्या योजनेला, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल प्रारंभ केला. अर्थसंकल्पाच्या संदर्भात विविध उद्योजकांशी चर्चा करण्यासाठी काल मुंबईत घेतलेल्या कार्यक्रमात त्यांनी या योजनेची सुरुवात केली. या योजनेमुळे एम एस एम ई ना यंत्रसामग्री किंवा उपकरणं खरेदी करण्यासाठी, १०० कोटी रुपयांपर्यंतचं कर्ज तारणमुक्त स्वरुपात उपलब्ध होईल. गेल्या वर्षी जुलै महिन्यात सादर झालेल्या अर्थसंकल्पात सरकारनं या योजनेची घोषणा केली होती.

महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात पुरेशा तरतुदी नसल्याचे विरोधकांचे आरोप, सीतारामन यांनी फेटाळून लावले. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ राज्यातल्या गुंतवणूकदारांनाही मिळत असून, सरकारच्या धोरणामुळेच संरक्षण उत्पादन निर्यातीत महाराष्ट्र आघाडीवर आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

****

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला येत्या तीन मार्चपासून सुरुवात होणार आहे. पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर राज्यपालांचं अभिभाषण होईल. अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी सादर करणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

अधिकाधिक मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठाने, विशेषत: आदिवासी आणि ग्रामीण भागातल्या शाळांशी संपर्क वाढवावा, असं आवाहन, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. पुण्यात श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी – एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या दीक्षांत समारोहात ते काल बोलत होते. आदिवासी भागातल्या मुलींची उच्च शिक्षणातून होणारी गळती कमी करण्यासाठी, या संपूर्ण समस्येचं विद्यापीठानं अध्ययन करावं, अशी सूचनाही राज्यपालांनी यावेळी केली.

****

सर्वसामान्यांना लाभ देणारी कुठलीही योजना सरकार बंद करणार नसल्याचा पुनरुच्चार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. ते काल नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. काही योजनांचा लोकांनी गैरफायदा घेतला, त्याची तपासणी सुरू आहे. योजनांना पात्र असलेल्यांना लाभ निश्चित मिळेल असं

बावनकुळे यांनी सांगितलं. ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात काही बाबी प्रलंबित होत्या, त्याचं उत्तर सरकारनं दिलं असून, लवकरच या प्रकरणाचा निकाल लागेल आणि राज्य सरकार तातडीनं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेईल, अशी आशाही बावनकुळे यांनी व्यक्त केली.

****

वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट – एच एस आर पी बसवण्यासाठी राज्य परिवहन विभागाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. आता येत्या ३० एप्रिल पूर्वी एच एस आर पी बसवून घ्यावी, असं आवाहन परिवहन विभागाने केलं आहे. राज्यात २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एच एस आर पी बसवणं सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंधनकारक करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरू असलेली कामं तातडीने पूर्ण करण्याची सूचना, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाअंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या कामकाजाचाही मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना यांच्यासमवेत दानवे यांनी आढावा घेतला.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथल्या,राजकोट परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पायाभरणी, उद्या १९ फेब्रुवारीला होणार आहे. छत्रपतींचा योद्ध्याच्या वेषभूषेतला ६० फुटी पूर्णाकृती पुतळा इथं उभारण्यात येत आहे. राजकोट किल्ल्यावर यापूर्वी उभारलेला पुतळा कोसळल्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन, नवीन पुतळ्याची अंतर्गत संरचना, पूर्णतः स्टेनलेस स्टीलची असणार आहे. प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांच्या नोएडा इथल्या कारखान्यात हा पुतळा बनवला जात आहे.

****

दहावी–बारावीच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या वृत्ताचं, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ–सीबीएसईने खंडन केलं आहे. विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण करण्याच्या हेतुनं सामाजिक संपर्क माध्यमावरून काही लोक अशा अफवा पसरवत आहेत, मात्र त्यावर विश्वास ठेवू नये, असं आवाहन सीबीएसईने केलं

आहे. अशा अफवा पसरवणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात असल्याची माहितीही मंडळाकडून देण्यात आली. याबाबत कोणतीही शंका असल्यास, मंडळाच्या डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट सीबीएसई डॉट जीओव्ही डॉट इन, या संकेतस्थळावर पडताळणी करावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या कुंटूर तांडा इथं बारावीच्या परीक्षा केंद्रावर भौतिकशास्त्र आणि तर्कशास्त्राच्या पेपरच्यावेळी चार विद्यार्थ्यांना कॉपी करतांना काल माध्यमिक बोर्ड आणि उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या पथकाने पकडलं. जिल्ह्यात काल १०७ केंद्रावर, २३ हजार ३६१ विद्यार्थ्यांपैकी, २३ हजार ६९ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते.

****

अभिजात दर्जा मिळालेल्या मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचं आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नवी दिल्लीतल्या नियोजित ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त तयार केलेल्या संमेलन गीताचं काल राजभवनात राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ गायक हरिहरन, शंकर महादेवन, प्रियंका बर्वे, मंगेश बोरगावकर, शमीमा अख्तर आदींनी हे संमेलन गीत गायलं आहे.

**

दरम्यान, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचं हे साहित्य संमेलन दिल्लीत व्हावं, हा सुवर्णयोग असल्याचं मत, छत्रपती संभाजीनगर इथल्या साहित्यिक रसिका देशमुख यांनी व्यक्त केलं आहे. त्या म्हणाल्या...

> ***‘‘हे संमेलन दिल्लीत व्हावे हा मला एक सुवर्णयोग वाटतो. आणि खरोखरच ही प्रत्येक मराठी माणसासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. असं वाटतय आपली जबाबदारी वाढली आहे. आता मराठीच मराठीपण जपणं हे जास्त आपल्याला आता कटाक्षानं करावं लागणार आहे. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे तारा भवाळकर या लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मिळालेलं आहे. तो प्रत्यक्ष सोहळा डोळ्यानं बघणं हा माझ्यासाठी खूप आनंदाचा भाग आहे.’’***

दरम्यान, दिल्लीतल्या या नियोजित साहित्य संमेलनातल्या एका व्यासपीठाला, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचं नाव देण्यात येणार आहे. डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी काल बीड इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यासंदर्भातलं पत्रं अखिल भारतीय साहित्य मंडळाकडून मिळाल्याचं चांदणे यांनी सांगितलं.

****

पुस्तकं ही माणसाला उर्जा प्रदान करतात, असं ज्येष्ठ कवी केशव वसेकर यांनी म्हटलं आहे. परभणी जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या वतीने भरवण्यात आलेल्या, परभणी ग्रंथोत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रत्येकाने वाचन संस्कृती ही जोपासलीच पाहिजे, असं आवाहनही वसेकर यांनी यावेळी केलं.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने, शिवोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या अंतर्गत काल शिवकालीन शस्त्रांच प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं. मुंबईतल्या नालासोपारा इथल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी हे प्रात्यक्षिक सादर केलं. पाळणा गीत गायन स्पर्धाही काल घेण्यात आली.

**

लातूर इथं उद्या ‘जय शिवाजी, जय भारत पदयात्रा’ आयोजित करण्यात आली आहे. पदयात्रेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. या पदयात्रा पूर्वतयारीचा आढावा घेतल्यानंतर त्या बोलत होत्या.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात आव्हाणे बुद्रुक इथल्या निद्रिस्त गणेशाच्या माघी यात्रेची आज सांगता होणार आहे. संकष्ट चतुर्थी पासून प्रारंभ होणारी ही यात्रा तीन दिवस चालते. या यात्रेनिमित्ताने निद्रिस्त गणेशाची महापूजा करण्यात आली. राज्यातला हा एकमेव निद्रिस्त स्वरूपात असलेला स्वयंभू गणेश आहे. हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून या उत्सवाची ओळख असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड पोलीस दलातले पोलीस अंमलदार अमोल ससाणे यांची नवी दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस टी–२० क्रिकेट स्पर्धेत निवड झाली आहे. यासाठी नुकत्याच झालेल्या निवड चाचणीत ससाणे यांनी अष्टपैलू खेळाडू म्हणून संघात स्थान मिळवलं आहे.

****